**मे.जिल्हा खाण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (महाराष्ट्र शासन), महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव, परळी तालुकास्थित प्रस्तावित 32 वाळू घाटांच्या संदर्भात दिनांक 29/10/2020 रोजी सकाळी 11:00 वा.जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे व्हिडिओ कॉन्फरन्सिंग / सिसको वेबेक्स् मिटींग ॲपद्वारे घेण्यात आलेल्या पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

मे.जिल्हा खाण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (महाराष्ट्र शासन), महाराष्ट्र यानी प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव, परळी तालुकास्थित प्रस्तावित 32 वाळु घाटांच्या संदर्भात दिनांक 29/10/2020 रोजी सकाळी 11:00 वा. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे व्हिडिओ कॉन्फरन्सिंग / सिसको वेबेक्स् मिटींग ॲपद्वारे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य व्हिडिओ कॉन्फरन्सिंग / सिसको वेबेक्स् मिटींग ॲपच्या माध्यमातून उपस्थित होते.

1) **श्री.राहुल रेखावार,**
जिल्हा दंडाधिकारी, बीड,
जिल्हा बीड. — **अध्यक्ष**

2) **श्री.प्रविण जोशी,**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद. — **सदस्य**

3) **डॉ.योगिनी बाळंखे,**
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, जालना . — **समन्वयक**

जाहीर लोकसुनावणीसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग / सिसको वेबेक्स् मिटींग ॲपद्वारे उपस्थित असलेले सदस्य आणि सार्वजनिक सहभागींची यादी येथे जोडली आहे. डॉ.योगिनी बाळंखे, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, जालना तथा पर्यावरण विषयक जाहीर

लोकसुनावणीच्या समन्वयक यांनी उपस्थितांचे आभार मानुन पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी बीड जिल्ह्यातील 32 वाळू घाटांसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात येत आहे, त्याबाबतचा उद्देश विषद केला आणि सांगितले की, पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्र.एस.ओ.1533 दि.14 सप्टेंबर 2006 व सुधारित अधिसुचना क्र.एस.ओ.3067 (इ) दि.01/12/2009 अन्वये नदीपात्रातुन वाळु उपसा करण्यासाठी राज्य पर्यावरण मंत्रालयाची परवानगी घेणे आवश्यक आहे आणि याचाच भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे. त्यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यातील 32 वाळू घाटांसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याकरिता अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत केलेला अर्ज महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास दि.09/09/2020 रोजी प्राप्त झाला होता आणि त्या अनुषंगाने देशातील तसेच जिल्ह्यातील कोरोनाची साथ लक्षात घेता जिल्हादंडाधिकारी, बीड यांनी पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी ही व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात यावी असे आदेशित केले होते व त्यानुसार त्याबाबतची सार्वजनिक नोटीस ही दैनिक सामना (मराठी) आणि डेली द टाईम्स् ऑफ इंडिया (इंग्रजी) या वर्तमानत्रांमध्ये दिनांक 29/09/2020 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

त्यांनी पुढे सांगितले की, बीड जिल्ह्यातील 32 वाळु घाटांसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आज दि.29/10/2020 रोजी सकाळी 11:00 वा. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर अधिसुचनेनुसार प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यास अहवाल व कार्यकारीणी सारांश यांच्या इंग्रजी व मराठी प्रती या सदर भागातील एकूण 32 संबंधीत ग्रामपंचायत कार्यालये, तसेच विविध शासकीय कार्यालये जसे, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद, उप-प्रादेशिक कार्यालय - जालना आणि मुख्यालय - मुंबई, बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव व परळी येथील तहसील कार्यालये, जिल्हा परिषद कार्यालय, बीड, जिल्हा उद्योग केंद्र, बीड आणि नगरपरिषद कार्यालय, बीड इ. ठिकाणी अभ्यासासाठी

ठेवण्यात आल्या होत्या आणि सदर प्रकल्पाविषयी जर काही पर्यावरणविषयक विचार, सुचना, टिप्पणी, आक्षेप असतील तर ते सदर लोकसुनावणीची जाहीरात वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसात उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, जालना येथे नोंदवावेत अशी लोकांना विनंती करण्यात आली होती आणि त्या अनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, जालना किंवा अन्य कोणत्याही कार्यालयास आतापर्यंत सदर वाळू घाटांविषयी कोणतेही आक्षेप, सुचना, टिप्पणी, मौखिक, लिखित स्वरुपात किंवा ई-मेलद्वारे प्राप्त झालेले नाहीत. प्रत्यक्ष उपस्थितीसाठी आजची जाहीर लोकसुनावणी ही सिस्को वेबेक्स् मिटींग ॲपद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय, बीड, संबंधीत उपविभागीय कार्यालये व ग्रामपंचायत कार्यालये येथे घेण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले. व्यवस्था अशा प्रकारे करण्यात आलेली आहे की, नागरिक त्यांच्या जवळच्या कार्यालयामार्फत जाहीर लोकसुनावणीमध्ये भाग घेवू शकतील जेणेकरुन सामान्य नागरिकांना त्यांचे मत व्यक्त करणे सोपे जाईल. त्यांनी सांगितले की, जर कुणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरणविषयक काही विचार, सुचना, टिप्पणी, आक्षेप इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सुध्दा आज मौखिक अथवा लिखित स्वरुपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरणविषयकच विचारल्या जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरुन प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल व शंकाचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृत्तामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसुनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली येथे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यानंतर सदर जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली. त्यांनी अशी सुध्दा विनंती केली की, सार्वजनिक सहभागींनी सादरीकरण शांतपणे ऐकावे व नंतर प्रश्न, सुचना, टिप्पणी इ. व्यक्त कराव्यात.

नंतर प्रकल्प प्रवर्तक, श्री.हर्षद कांबळे, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतचे सादरीकरण ज्यामध्ये प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना, साधणे, करण्यात येणारे नियंत्रण उपाय इ. चा समावेश आहे ते सुरु केले आणि सांगितले की, महाराष्ट्र शासन पत्र क्र.संकीर्ण-2019/पी.के.01/ता.के.3 दि.03 डिसेंबर 2019

नुसार 05 हेक्टर क्षेत्रापेक्षा कमी खाणीसाठी सार्वजनिक सुनावणी घेणे आवश्यक आहे. वाळू घाटांसाठी पर्यावरणविषयक मंजूरी प्राप्त करुन देण्याचे काम मे.इंटीग्रेटेड प्रेसिजन सिस्टीमस् अॅंड सर्व्हिसेस प्रा.लि.यांना जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्यामार्फत देण्यात आलेले आहे. भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, औरंगाबाद यांनी बीड जिल्ह्यातील 32 वाळू घाटांच्या खाणकाम आराखड्यास मान्यता दिलेली आहे. फॉर्म IM, PFR, EMP, RA, DSR मधील अर्ज आणि वाळू घाटांसाठी मंजूर खाणकाम आराखडा त्यासोबत पर्यावरण मंजूरीसाठी जनसुनावणीची कार्यवाही करण्यात येईल.

त्यांनी सन 2020-2021 मधील बीड जिल्ह्यातील परळी तालूक्यातील गोदावरी नदी पात्रातील संयुक्त वाळू घाटांचा तपशील खालीलप्रमाणे विषद केला.

| अ. क्र. | वाळू घाट | गट क्र. | एकूण क्षेत्र हे. | क्षेत्र Mineable | क्षेत्र Non-Mineable | क्षेत्रफळ लांबी×रुंदी×खोली | लिलावासाठी उपयुक्त वाळुसाठा (ब्रास) | Mineable Sand in Brass (75%) | Non Mineable Sand in Brass (25%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 30 | डिग्रस-1 | 10 ते 12, 1, 2, 0, 21, 23, 29 | 3.85 | 2.89 | 0.96 | 700×55×2.10 | 28569 | 21427 | 7142 |
| 31 | डिग्रस-2 | 30, 35, 39, 40, 42 ते 44, 47, 48, 51 ते 57, 60, 61 | 4.00 | 3.00 | 1.00 | 800×50×2.50 | 35336 | 26502 | 8834 |
| 32 | डिग्रस-3 | 60 ते 66, 69 ते 75,79 | 3.25 | 3.44 | 0.81 | 650×50×2.10 | 24117 | 18087 | 6029 |

त्यांनी पुढे वाळूखाणीतील उत्खननाची पध्दत विषद केली आणि सांगितले की, वाळु घाटातील वाळुचे उत्खनन हे ड्रिलींग व ब्लास्टींग पध्दतीचा वापर न करता करण्यात येईल आणि वाळुचे उत्खनन हे कोरड्या नदीपात्रातुन मजुराद्वारे फावडे, कुदळ, घमेले इ. साधनांचा वापर करुन करण्यात येईल. अन्य लागणारी यंत्रे ही ट्रॉलीसह ट्रॅक्टर असेल, वाहतूक ही ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे वाळुच्या जागेपासून निश्चित केलेल्या डेपोच्या जागेपर्यंत व ग्राहकांपर्यंत करण्यात येईल. वाळू उत्खननामुळे उघडे पडलेले क्षेत्र पावसाळ्यानंतर आपोआप भरले जाईल आणि वृक्षारोपण हे नदीकाठी व वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या रस्त्यालगत करण्यात येईल.

**पर्यावरण व्यवस्थापन योजना :**

श्री.कांबळे यांनी पर्यावरण व्यवस्थापना विषयी खालीलप्रमाणे विषद केले -

**वायु प्रदूषण नियंत्रण उपाय :** वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या कच्च्या रस्त्यावर वेळोवेळी पाणी शिंपडले जाईल आणि वाळू वाहतूक टप्प्या-टप्प्याने ट्रॅक्टर व ट्रकवर ताडपत्रीचे आच्छादन करुन केल्या जाईल, वाहतूकीदरम्यान वाळू गळती होवू नये म्हणून काळजी घेण्यात येईल आणि नदीकाठी व वाळू जवळील मोकळया जागेत वृक्षारोपण करण्यात येईल.

**ध्वनी नियंत्रण उपाय :** उत्खनन व वाळू वाहतुक फक्त दिवसाच्या वेळी केले जाईल. ध्वनी प्रदूषण हे फार कमी प्रमाणात अपेक्षित आहे, वाहनांचा आवाज कमी करण्यासाठी वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमितपणे देखभाल केली जाईल आणि वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या गती नियंत्रीत केल्या जाईल.

**जल प्रदूषण नियंत्रण उपाय :** वाळू उत्खनन फक्त कोरड्या नदीपात्रातून केले जाईल, उत्खनन केलेल्या खड्ड्यांची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीपेक्षा वर ठेवली जाईल, नदीचा प्रवाह कृत्रीमरित्या वळविला जाणार नाही, नदीपात्रात वाहने धुण्यास प्रतीबंध राहील, उत्खननामधुन कोणताही सांडपाणी प्रवाह निर्माण होणार नाही, कामगारांसाठी फिरत्या शौचालयांची व्यवस्था केली जाईल आणि उत्खनन पावसाळयात व पूरात टाळले जाईल जेणेकरुन नवीन वाळूचा थर तयार होण्यास मदत होईल.

**जमीन पर्यावरण :** कोरड्या नदीपात्रात वाळू उत्खननामुळे तात्पुरते खड्डे तयार होतील जे पावसाळयामध्ये पुन्हा भरले जातील, शास्वत वाळु उत्खनन मार्गदर्शक तत्त्वानुसार (Sustainable Sand Mining Guidelines) नदीच्या रुंदीच्या तीन मीटर किंवा रुंदीच्या 1/10 व्या जागेचे सुरक्षा अंतर नदीच्या काठापासून सोडले जाईल, पॉलीथीन पिशवी, ज्यूट पिशवी इ.कचरा नदीपात्रात टाकण्यास परवानगी राहणार नाही. उत्खननासाठी दिलेल्या परवानगीपेक्षा जास्त उत्खननास परवानगी राहणार नाही आणि आधी सांगितल्याप्रमाणे नदीकाठी व जवळपासच्या मोकळया जागेत वृक्षारोपन केले जाईल.

**हरितपट्टा विकास योजना :** वाळूपट्ट्यांच्या दोन्ही बाजूला तसेच नदीकाठच्या बाहेरील सीमा व रस्त्याच्या कडेला रोपांमध्ये 2 मिटरचे अंतर ठेवून हेक्टरी 500 झाडे लावले जातील. वृक्षारोपणासाठी चांगल्या प्रजातींच्या शिफारशीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| वृक्षाच्या प्रजातीचे नाव | स्थानिक नाव | महत्तव |
|---|---|---|
| आझदीरक्ता इंडिका | कडूलिंब | तेल उत्पादन |
| टेक्नो ग्रँडिस | टिक | बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ, प्रवि जैविक |
| फिकस रिलिओसिया | पिंपळ | औषधी उपयोगी फळे |
| बांबुसा वल्गारिस | बांबू | अँथेलमिटिक अँटी इंफ्लेमेटरी ऑस्ट्रिजंट प्रॉपर्टीज |
| महुका लाफगीफीसिया | महु | उत्तेजक आणि खोकल्यासाठी |

**व्यवसायिक आरोग्य व सुरक्षा व्यवस्थापन :** खाण चालकांना वैयक्तिक संरक्षण साधणे, जसे कान, डोळा व हात यासाठी प्रदान करण्यात येतील, या व्यतिरिक्त सुरक्षा हेल्मेट, बुट दिले जातील, कामगारांना मास्क दिले जातील. खाण कामगारांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येईल आणि खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल.

त्यांनी पुढे सांगितले की, बीड जिल्ह्यातील प्रस्तावित वाळू घाटांचे उत्खनन क्षेत्र जसे गेवराई तालुका-25, माजलगाव तालुका-4 आणि परळी-3 तालुका हे 5 हेक्टरपेक्षा कमी आहे. त्यामुळे ते MoEF & CC च्या मार्गदर्शक सुचनांनुसार B-2 या श्रेणीत मोडते. उत्खननाच्या कमी प्रमाणामुळे पर्यावरणावर परिणाम होण्याची शक्यता नाही आणि त्यामुळे ते गावाच्या फायद्याचे ठरेल. प्रस्तावित प्रकल्प स्थानिक लोकांना अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी प्रदान करेल. प्रस्तावित प्रकल्प सामाजिक, पायाभूत आणि क्षेत्राच्या सर्वांगीण विकासास सकारात्मक योगदान देईल आणि हवा, पाणी, आवाज, माती, घनकचरा व्यवस्थापन इ.सारख्या पर्यावरण विषयक प्रश्नांवर MoEF & CC च्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्य केले जाईल.

प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण संपविण्यापूर्वी त्यांनी सन 2020-2021 मधील बीड जिल्ह्यातील गेवराई व माजलगाव तालूक्यातील गोदावरी नदीपात्रातील संयुक्त वाळू घाटांचा तपशिल खालीलप्रमाणे विषद केला.

| अ. क्र. | वाळू घाट | गट क्र. | एकूण क्षेत्र हे. | क्षेत्र Mineable | क्षेत्र Non-Mineable | क्षेत्रफळ लांबी×रुंदी×खोली | लिलावासाठी उपयुक्त वाळुसाठा (ब्रास) | Mineable Sand in Brass (75%) | Non Mineable Sand in Brass (25%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बोरगांव बु.1 | 1, 56, 156 | 1.80 | 1.35 | 0.45 | 450×40×0.80 | 5088 | 3816 | 1272 |
| 2 | बोरगांव बु.2 | 170, 172, 173, 174, 176, 1 | 4.80 | 3.60 | 1.20 | 1200×40×1.00 | 16961 | 12721 | 4240 |
| 3 | पाथरवाला बु.1 | 60, 61, 62 | 3.90 | 2.93 | 0.98 | 650×60×0.80 | 11025 | 8269 | 2756 |
| 4 | पाथरवाला बु.2 | 1, 2 | 4.20 | 3.15 | 1.05 | 700×60×0.80 | 11873 | 8905 | 2968 |
| 5 | सुरळेगाव-1 | 135, 136, 2, 4, 5, 6, 8, 9 | 4.73 | 3.54 | 1.18 | 1350×35×1.00 | 16696 | 12522 | 4174 |
| 6 | सुरळेगाव-2 | 12, 13, 15 ते 18 | 4.90 | 3.68 | 1.23 | 1400×35×1.20 | 20777 | 15583 | 5194 |
| 7 | पांचाळश्वर | 68, 1 | 1.75 | 1.31 | 0.44 | 500×35×1.20 | 7420 | 5565 | 1855 |
| 8 | राक्षसभूवन-1 | 187 ते 192, 2, 3, 4 | 4.96 | 3.72 | 1.24 | 1240×40×1.20 | 21032 | 15774 | 5258 |
| 9 | राक्षसभूवन-2 | 27 ते 30, 32 ते 37 | 4.80 | 3.60 | 1.20 | 1600×30×1.30 | 22049 | 16537 | 5512 |
| 10 | म्हाळसपिंपळगाव | 2 ते 10, 12, 313, 16, 17, 23 | 4.95 | 3.71 | 1.24 | 1100×45×1.20 | 20989 | 15742 | 5247 |
| 11 | सावळेश्वर | 3 ते 8, 10 | 4.75 | 3.56 | 1.19 | 950×50×1.20 | 20141 | 15106 | 5035 |
| 12 | सावरगाव नि. | 28 ते 30, 3, 4, 8, 9 | 3.38 | 2.53 | 0.84 | 750×45×1.10 | 13118 | 9839 | 3280 |
| 13 | नागझरी | 2 ते 5 | 1.80 | 1.35 | 0.45 | 450×40×0.80 | 5088 | 3816 | 1272 |
| 14 | संगमजळगाव-1 | 40, 43, 44, 45 | 3.75 | 2.81 | 0.94 | 750×50×1.20 | 15901 | 11926 | 3975 |
| 15 | संगमजळगाव-2 | 2, 3, 4 | 4.20 | 3.15 | 1.05 | 700×60×1.80 | 26714 | 20035 | 6678 |
| 16 | हिंगणगाव-1 | 51 ते 54, 2, 4 | 4.75 | 3.56 | 1.19 | 950×50×1.40 | 23498 | 17624 | 5875 |
| 17 | हिंगणगाव-2 | 13 ते 15, 17 ते 19 | 4.85 | 3.64 | 1.21 | 970×50×1.60 | 27420 | 20565 | 6855 |
| 18 | बोरगावथड्डी-1 | 40, 41, 43, 46 | 4.41 | 3.31 | 1.10 | 980×45×1.10 | 17141 | 12856 | 4285 |
| 19 | बोरगावथड्डी-2 | 4 ते 8 | 4.95 | 3.71 | 1.24 | 900×55×1.00 | 17491 | 13118 | 4373 |
| 20 | गंगावाडी-1 | 279 ते 284, 329 | 4.95 | 3.71 | 1.24 | 900×55×1.00 | 17491 | 13118 | 4373 |
| 21 | गंगावाडी-2 | 3, 54, 355 | 1.80 | 1.35 | 0.45 | 300×60×1.00 | 6360 | 4770 | 1590 |
| 22 | राजापूर-1 | 294 | 4.68 | 3.51 | 1.17 | 850×55×1.20 | 19823 | 14867 | 4956 |
| 23 | राजापूर-2 | 10, 21, 22, 25, 26, 34 | 4.95 | 3.71 | 1.24 | 900×55×1.10 | 19240 | 14430 | 4810 |
| 24 | राजापूर-3 | 39, 40, 44 ते 46, 49, 50 ते 53 | 4.95 | 3.71 | 1.24 | 900×55×0.90 | 15742 | 11807 | 3936 |
| 25 | काठोडा | 6, 7, 8, 10 | 4.95 | 3.71 | 1.24 | 1100×45×1.00 | 17491 | 13118 | 4373 |
| 26 | रिधोरी | 177, 1 ते 3, 12, 13, 15 ते 18 | 4.50 | 3.38 | 1.13 | 900×50×1.00 | 15901 | 11926 | 3975 |
| 27 | कवडगावथड्डी | 37 ते 39, 42, 1, 3 ते 5 | 3.75 | 2.81 | 0.94 | 1250×30×0.80 | 10601 | 7951 | 2650 |
| 28 | गव्हाणथड्डी | 12, 18, 21 | 4.10 | 3.08 | 1.03 | 820×50×0.80 | 11590 | 8693 | 2898 |
| 29 | आडोळा | 72, 78 | 1.20 | 0.90 | 0.30 | 300×40×1.00 | 4240 | 3180 | 1060 |
| एकूण | | | 117.46 | 88.08 | 29.4 | | 458901 | 344179 | 114725 |

नंतर श्री.कांबळे यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण संपविले.

प्रकल्प प्रवर्तकांनी सदर प्रकल्पाचे सादरीकरण संपविल्यानंतर, डॉ.योगिनी बाळंखे यांनी सर्व ऑनलाईन सार्वजनिक सहभागींना व्हिडिओ चालु करणे व ऑडिओ बंद करण्याबबात विनंती केली. श्री.तुषार ठोंबरे, अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांनी वाळु घाटांच्या सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या सादरीकरणाबाबत जर कुणाला काही शंका, वगैरे असतील तर त्यांनी स्वतःचे नाव व गावाचे नाव सांगुन विचारावेत अशी सार्वजनिक सहभागींना विनंती केली. जी व्यक्ती शंका उपस्थित करील त्या व्यक्तीचे त्यांच्या शंकेसहीत नाव, गावाचे नाव, मोबाईल नंबर लिहून घ्यावे अशी देखील त्यांनी संबंधीत तलाठी, ग्रामसेवक यांना विनंती केली. कारण त्याचा सदर जाहीर लोकसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये समावेश करावयाचा आहे.

जाहीर लोकसुनावणी दरम्यान बीड जिल्ह्यातील, गेवराई, माजलगाव आणि परळी तालुक्यातील संबंधीत भागातील सार्वजनिक सहभागींनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग / सिस्को वेबेक्स् मिटींग ॲपद्वारे सदर प्रकल्पाबाबत त्यांच्या शंका, सुचना इ.व्यक्त केल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

**माजलगाव तहसिल क्षेत्र, जि.बीड.**

1) **श्री.संतोष नरहरी तौर, रिधोरी गाव, ता.माजलगाव, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, पाण्याचा प्रश्न गंभीर आहे कारण वाळू उपशानंतर उन्हाळयामध्ये शेतकऱ्यांना पाणी टंचाईच्या समस्यांना तोंड द्यावे लागते आणि जर पाणी कमी झाले व वाळु उपसा झाला तर गंगेचं पाणी पुर्णपणे खारट होते.

2) **श्री.गोपाळ बाजीराव तौर, रिधोरी गाव, ता.माजलगाव, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, जेव्हा वाळु घाटांचा लिलाव होतो तेव्हा वाळू गाड्यांच्या वाहतुकीमुळे त्यांच्या गावाचे रस्ते खराब होतात आणि ते रस्ते 20-30 वर्षांच्या काळापर्यंत दुरुस्त होत नाही.

3) **श्री.प्रल्हाद तौर, गाव शेलगावथडी - रिधोरी, ता.माजलगाव, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, वाळु लिलाव चांगली गोष्ट आहे कारण सदर भागात रात्रंदिवस पुष्कळ

वाळूतस्कर आहेत, रस्त्याच्यासुध्दा समस्या आहेत. जर वाळू लिलाव झाला तर त्यांच्या ग्रामपंचायतीला फायदा होईल असेसुध्दा त्यांनी सांगितले.

4) **श्री.गोपाल शिवाजीराव तौर, सरपंच, गट ग्रामपंचायत, रिधोरी, कवडगांव, ता.माजलगाव, जि.बीड** यांनी सांगितले की, वाळू उपशामुळे जनावरे आणि त्यांच्या गावाला पाणी टंचाईच्या समस्येला तोंड द्यावे लागते, ती गंभीर समस्या आहे आणि वाळू गाड्या वाहतुकीमुळे वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे रस्ते खराब होतात व त्याचा त्यांना त्रास होतो.

5) **गवाणथडी गाव, ता.माजलगाव, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, गवाणथडीच्या गावकऱ्यांची वाळू लिलावाविषयी काही हरकत नाही.

6) **आडोळा गाव, ता.माजलगाव, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, गट ग्रामपंचायत सुलताना-आडोळा येथील गावकऱ्यांची वाळू लिलावाबाबत काही हरकत नाही.

7) **श्री.एकनाथ देवीदास माने, उप-सरपंच, ग्रामपंचायत, कवडगाव थडी, ता.माजलगाव, जि.बीड** यांनी सांगितले की, सध्याचा रस्ता खराब होतो, पाणी कमी होते व रस्त्याने वाळू गाड्या वाहतुकीमुळे पिकांवर धुळ बसते. म्हणून त्यांना पर्यायी रस्ता तयार करुन द्यावा, अशी त्यांनी विनंती केली.

8) **श्री.रमेश मोहनराव तौर, सामाजिक कार्यकर्ता, कवडगाव थडी, ता.माजलगाव, जि.बीड** यांनी सांगितले की, वाळू ठेका घेतल्यानंतर वाळू ठेकेदार कोणत्याही अटी किंवा नियमाचे पालन करित नाहीत. त्यावर डॉ.प्र.म.जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ तथा समिती सदस्य यांनी स्पष्ट केले की, त्यासाठी शासन निर्णय क्र.100512/पीके-300/मुंबई-32 दिनांक 03/09/2019 आहे, ज्यामध्ये ठेकेदाराची पात्रता, वगैरे दिलेले आहेत आणि सदर शासन निर्णयानुसार ठेकेदाराची नेमणूक केली जाते. त्यांनी सांगितले की, जेव्हा शासन निर्णय असेल तेव्हा अशा शासन निर्णयाचे पालन न करण्याच्या घटना घडायला नाही पाहिजे आणि जर सदर शासन निर्णयाचे पालन होत नसेल तर खाण अधिकारी त्या प्रकरणी लक्ष घालतील. नंतर श्री.तौर यांनी सांगितले की, वाळु ठेकेदार जर शासन निर्णयाचे पालन करत असतील तर ती चांगली गोष्ट आहे.

9) **श्री.गणेश तुकाराम तौर, माजी सरपंच, ग्रामपंचायत, कवडगाव थडी, ता.माजलगाव, जि.बीड** यांनी सांगितले की, त्यांच्या गावच्या रस्त्यांची अवस्था फार वाईट होती, त्यांच्या गावाला रस्ते नव्हते आणि आता नवीन रस्ता बांधला आहे. वाळु लिलावामुळे मागे हिवरथडी येथे दोन व्यक्तींचे अपघात घडले होते. म्हणून त्यांनी विनंती केली की, वाळु लिलावामुळे त्यांना काही समस्या होवू नये. वाळू लिलावासाठी संबंधीतांवर अटी आणि शर्ती लादण्यास हवे व वाळु उत्खनन हे नियमाप्रमाणे करायला पाहिजे. त्यांनी पुढे सांगितले की, पूर्ण उत्खनन झाले तर त्यांना पिण्यासाठी पाणी तसेच शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी पाणी शिल्लक राहत नाही. म्हणून उत्खनन नियमाप्रमाणे करावे असे ठेकेदारांना सुचित करावे अशी त्यांनी विनंती केली. त्यांनी सांगितले की, ते अगोदरच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन करतात, ज्यांनी सदर भागाची संपूर्ण काळजी घेतली आणि वाळु लिलावाबाबत जर त्यांनी काही तक्रार केली तर त्यांच्या तक्रारीची काळजी करावी अशी देखील त्यांनी विनंती केली. डॉ.जोशी यांनी सांगितले की, श्री.गणेश तौर यांचे म्हणणे बरोबर आहे आणि त्यांनी असे सुध्दा निदर्शनास आणून दिले की, वरील उध्दृत शासन निर्णयात मुद्दा (ड) मध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे. जसे - "जर दुष्काळ प्रवण आणि टंचाईग्रस्त भागात सततच्या उत्खननामुळे पिण्याच्या पाण्यावर परिणाम होत असेल तर अशा भागात उत्खनन करु नये." वाळु वाहतुक करण्यासाठी रिधोरी आणि कवडगावच्या शिव रस्त्याचा वापर करावा असे ठेकेदारांस सुचवावे अशी श्री.गणेश तौर यांनी पुढे विनंती केली कारण त्यामुळे दोन्ही गावांना काही अडचण होणार नाही.

10) **सत्यवान सुंदरबाई, सामाजिक कार्यकर्ती, माजलगाव तालुका, जि.बीड** यांनी सांगितले की, वाळू लिलावापूर्वी, नंतर आणि लिलावाच्या वेळी असे सांगितले जाते की, अटी व शर्ती मान्य आहेत, परंतु त्यानंतर अटी व शर्तीचे पालन केले जात नाही. वाळू लिलावासाठी कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर हल्ले होतात आणि या बाबतीत कायद्याचे पालन केले जात नाही. यांत्रिक पध्दतीने वाळूचा उपसा मोठ्या प्रमाणावर केला जातो. जे पर्यावरणासाठी तसेच गावांच्या विकासासाठी धोकादायक आहे, म्हणून प्रशासनाने तसेच गावातील लोकांनी अशा बाबीकडे लक्ष द्यायला पाहिजे, असे त्यांनी

सांगितले. दुसरे, वाळुच्या बाबतीत जो काही 35% निधी ग्रामपंचायतीसाठी असतो तो संबंधीत ग्रामपंचायतीला मिळत नाही आणि सदर निधी ग्रामपंचायत सदस्य किंवा वाळू ठेकेदार यांचेकडे पाठविला जातो व तो ग्रामपंचायतला पाठविला जात नाही. त्यामुळे रस्ते, गाव इ. (जसे रिधोरी, तेलगाव इ.) च्या विकासांची कामे केली जात नाही आणि सदर निधी मिळतही नाही व तो मिळविण्यासाठी प्रयत्नही केले जात नाही. म्हणून अशा गोष्टींकडे लक्ष देण्याची गरज आहे आणि लिलावानंतर सदर निधी संबंधीत ग्रामपंचायतला त्यांच्या खात्यावर तीन महिन्यात हप्त्याने मिळाला पाहिजे व तो कोणत्याही ग्रामपंचायत सदस्य अथवा अन्य कुण्या व्यक्तिच्या खात्यावर जायला नको असे त्यांनी सांगितले. त्यांनी पुढे सांगितले की, रस्ते खराब झालेले आहेत व वाळू लिलावाची प्रक्रिया चालू आहे. म्हणून लिलावापूर्वी सदर रस्ते दुरुस्त व्हायला पाहिजे. जेणेकरुन वाहने, लोक, महिला, लहान मुले, शाळांच्या बसेस इ. ना कोणताही त्रास व्हायला नको. त्यांनी सांगितले की, दूसरा महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, शासकीय अधिकाऱ्यांचे नातेवाईक सुध्दा वाळु तस्करीमध्ये सामिल आहेत व अशा घटना / असे प्रकार माजलगावामध्ये घडतात आणि अशा लोकांच्या माध्यमातून माजलगावात काही अधिकारी मोठ्या गाड्यांना पावत्या देतात. रस्त्याच्या बाजूला असलेली वाळू मोठ्या प्रमाणावर दूर घेवून जातात, वगैरे परंतु सदर प्रक्रियेमध्ये महसुल अधिकारी दिसून येत नाही व त्यांचे नाव उघडपणे दिसत नाही. परंतु असे अधिकारी वाळू लिलाव प्रक्रियामध्ये सामिल व्हायला नाही पाहिजे किंवा या बाबतीत काही नियम पाहिजे. ज्या महिला वाळु लिलाव / ठरावासंबंधी सभेच्या (बैठकीच्या) सदस्या आहेत किंवा गावातील कोणत्याही सदस्य आहे अशा महिलांना वाळु लिलावाच्या सभेसाठी / बैठकीसाठी फक्त गृहीत धरले जाते, परंतु महिलांचे मत, निर्णय जाणून घेण्यासाठी जसे रिधोरी, शेलगाव, वगैरे ठिकाणी वाळु लिलाव घ्यायला पाहिजे किंवा नाही, वगैरेसाठी महिलांसाठी खास बैठक आयोजित करायला पाहिजे. कारण वाळू व्यवसाय हे एक उत्पन्नाचे साधण आहे. जसे ते उत्खननाच्या माध्यमातुन शासनाला उत्पन्न देते त्याचप्रमाणे त्यामुळे वाळु माफीयाच्या माध्यमातुन नं.2 चा धंदा होतो. ज्यामध्ये मोठे राजकीय पुढारी सामिल आहेत. त्यामुळे गावांच्या विकासास बाधा निर्माण होते. जेव्हा त्यांनी वाळु

माफियांच्या विकास उपक्रमाविषयी बोलण्यास सुरुवात केली तेव्हा डॉ.योगिनी बाळंखे, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, जालना तथा जाहीर लोकसुनावणी समितीच्या समन्वयक यांनी **सत्यवान** सुंदरबाई यांना मुद्द्यावर या आणि पर्यावरणासंबंधी जर काही प्रश्न असतील तर ते मुद्देसुद मांडा, अशी विनंती केली. डॉ.बाळंखे यांनी पुढे सांगितले की, **सत्यवान** सुंदरबाई यांचा मुद्दा लक्षात आलेला आहे व त्याची नोंद घेतलेली आहे. आणखी काही जास्तीचे मुद्दे विचारायचे आहेत काय असे डॉ.बाळंखे यांनी पुन्हा त्यांना विचारले. डॉ.जोशी यांनी सांगितले की, **सत्यवान** सुंदरबाई यांनी जे मुद्दे उपस्थित केले ते बरोबर आहेत, परंतु त्यांनी पर्यावरणाविषयी जास्त मुद्दे उपस्थित केले नाहीत व जे काही मुद्दे उपस्थित केले त्यासाठी शासन निर्णय आहे आणि संबंधीतांकडून त्याची अंमलबजावणी होईल. सदर शासन निर्णयात जिल्हा खाण अधिकारी यांना निर्देश आहेत व जिल्हा खाण अधिकारी भविष्यात त्याची पूर्तता करुन घेतील. जर एखादा अपघात झाला तर संबंधीत वाळू कंत्राटदाराने त्याबाबत जवळच्या पोलीस स्टेशन ताबडतोब कळवायला पाहिजे. त्यांनी त्यांना (सत्यवान) विनंती केली की, सदर दि.03/09/2019 चा शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे, तो पाहावा. ज्यामध्ये त्यांनी विचारलेल्या सगळया मुद्यांच्या माहितीचा उल्लेख केलेला आहे आणि त्यांनी पुन्हा विनंती केली की, फक्त पर्यावरणाविषयीचे मुद्दे विचारावेत. **सत्यवान** सुंदरबाई यांनी सांगितले की, वाळुचे उत्खनन हे नियमाप्रमाणे होत नाही कारण नदीपात्रात उत्खननाची खोली जास्त दिसून येते आणि जर वाळू लिलावास गावकरी विरोध करीत असतील किंवा जर एखादा निर्णय ग्रामसभा / जनसभेमध्ये घेतला जात असेल तर शासनाने त्यानुसार निर्णय घ्यावा अशी त्यांनी विनंती केली.

**परळी तहसिल क्षेत्र, जि.बीड.**

11) **श्री.धोपटे प्रभाकर मधुकर, डिग्रस गाव, ता.परळी, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, वाळु लिलावासाठी त्यांची काही हरकत नाही. परंतु लिलावामध्ये समाविष्ट असलेल्या व्यक्तींना संरक्षण द्यावे अशी त्यांनी विनंती केली.

**गेवराई तहसिल क्षेत्र, जि.बीड.**

12) **श्री.बाबासाहेब लक्ष्मण जाधव, माजी सरपंच, ग्रामपंचायत पाथरवाला (बु.), ता.गेवराई, जि.बीड** यांनी सांगितले की, निविदा काढण्यामुळे ठेकेदार वाळू उपसा करण्यासाठी ठरवून दिलेल्या 3 फुट खोलीच्या खड्ड्याऐवजी 14 फुट (2 परस) खोलीचे खड्डे खोदतात व सदर खड्डे मातीने भरले जातात. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो आणि निसर्गाचा एक नियम आहे की, जर वाळुमध्ये एकवेळा पाणी जिरले तर त्यामध्ये 11 वेळा पाणी परत येते. दुसरी गोष्ट अशी की, स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा आता त्यांच्या गावात रस्ता बांधलेला आहे. 20 वर्षांनंतर निविदा काढल्या होत्या. ठेकेदार वेगवेगळया ठिकाणी खड्डे खोदतात आणि धुळीमुळे रस्त्याच्या बाजुला असलेल्या त्यांच्या शेतामध्ये एक एकर पर्यंत पिक उत्पादन दिसून येत नाही. वाळू निविदामध्ये जे लोक सामिल असतात ते दारु पिऊन बिनधास्त गाड्या चालवतात. त्यामुळे विविध अपघात होतात आणि पुष्कळ लोकांना त्यांचा जीव गमवावा लागतो. डॉ.बाळंखे यांनी त्यांना 20 वर्षांपासून काय केले असे विचारले तर श्री.जाधव यांनी सांगितले की, 20 वर्षांपूर्वी निविदा काढल्यामुळे रस्ता पूर्णपणे खराब झाला होता. त्यांनी पुन्हा सांगितले की, भारत स्वातंत्र झाल्यानंतर पाथरवाला(बु.) येथे पहिल्यांदा रस्ता बांधला आणि रस्त्याच्या बाजूची एक एकर जमिन खराब होण्याबाबत नुकसान भरपाई दिलेली नाही व गंगेतील वाळु उपशामुळे संपूर्ण पाणी साठे नष्ट होतात. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे पाणी जनावरांसाठी, शेतीसाठी, पिण्यासाठी शिल्लक राहत नाही.

13) **श्री.ज्ञानेश्वर नारायण जाधव, पाथरवाला (बु.) गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढण्यामुळे त्यांच्या गावातील पर्यावरण व रस्ते खराब होतात, म्हणून ठेकेदारांच्या निधीमध्ये कपात करुन व तो ग्रामपंचायतमध्ये ठेव ठेवून रस्त्याच्या दुरुस्ती / देखभालीची व्यवस्था करावी आणि ग्रामपंचायत रस्त्याची दुरुस्ती करतील अशी त्यांनी विनंती केली. त्यांनी सांगितले की, त्यांच्या गावाला दोन रस्ते आहेत आणि पर्यायी रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी त्यांनी विनंती केली.

14) **श्री.दादासाहेब ग्यानदेव पवार, पाथरवाला (बु.) गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढल्यानंतर ठेकेदार बोटीच्या सहाय्याने वाळु उपसा करतील कारण गोदावरी नदी पाण्याने पूर्ण भरलेली आहे आणि बोटी चालविल्यानंतर तेलाचे तवंग पाण्यावर पसरतील. पिण्याच्या पाण्याची काहीही व्यवस्था केलेली नाही. जनावरांसाठीचे पिण्याचे पाणी प्रदूषीत होईल. बोअरवेल (इंधन विहिरी) आहेत परंतु त्यांना खाऱ्या पाण्याचे स्त्रोत आहे आणि त्यांच्या गावात गोड पाणी उपलब्ध नाही. गाळण (Filter) व्यवस्था केलेली नाही आणि सदर पाणी जनावरांना पिण्यासाठी उपयुक्त राहणार नाही. दुसरे त्यांनी सांगितले की, रस्ता खराब होईल. जर ठेकेदारास निविदा घ्यायच्या असतील तर त्यांनी स्वतःच्या खर्चाने पर्यायी रस्ता तयार करुन वाळु वाहतुक करावी किंवा शासन रस्ता तयार करुन देतील काय? त्यांनी पुढे सांगितले की, ते लोक दारु पिऊन गुंडागर्दी करतात. साधारणतः एक एकर शेतातील पिके धुळ बसल्यामुळे खराब होतात व संबंधीत त्याची काही दखल घेत नाही. म्हणून निविदा काढु नये अशी त्यांनी विनंती केली.

15) **श्री.देविदास दशरथ पारे, गाव पाथरवाला (बु.), ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी, त्यांच्या भागात गोदावरी नदीचे पात्र हे 240 फुटांचे आहे परंतु फक्त 40 फुट लांबी पर्यंत वाळु शिल्लक आहे आणि बाकी नदीकाठच्या बाजुला फक्त गाळ साचलेला आहे. म्हणून त्यांनी विनंती केली की, नदीतून सदर गाळ काढणे व नंतर निविदा काढणे किंवा न काढणे. त्यामुळे रस्त्याने चालणाऱ्या लोकांना त्रास होतो. ते गहू आणि कांद्याची लागवड करतील ते धुळीमुळे उन्हाळयात खराब होतील. त्यांनी नंतर याबबातची नुकसान भरपाई कोण देईल आणि त्यासाठी शासन जबाबदार राहिल काय असे विचारले.

16) **श्री.महेश सदाशिव चिळके, पाथरवाला (बु.) गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, पाथरवाला (बु.) हे गाव साधारणतः 1700 ते 1800 लोकसंख्या असलेले फार लहान गाव आहे आणि आताच गुळसगाव येथे एक बंधारा बांधलेला आहे. ज्यामध्ये साधारणतः 2 ते 3 टीएमसी पाणी साठवलेले आहे आणि सदर भागातील सर्व लोक, प्राणी, शेतकरी इ. पिण्याच्या पाण्यासाठी, शेतीसाठी इ. सदर पाण्यावर अवलंबून आहे आणि जर निविदा काढल्या तर संपूर्ण पाणी सोडवावे लागेल कारण पाण्याशिवाय वाळू

उपसा केल्या जाऊ शकणार नाही आणि निविदा नंतर, गंगेमध्ये पाणी राहणार नाही. त्यामुळे ऊस इ.सारखे पिके, शेतजमीन खराब होईल. त्यांनी पुढे सांगितले की, जर निविदा ग्रामपंचायतीतर्फे घेण्यात आल्या तर ते गावकऱ्यांच्या फायद्याचे होईल आणि जर त्या तालुका / जिल्हा स्तरावर पुढाऱ्यांतर्फे घेण्यात आल्या तर त्यामुळे गावकऱ्याचे नुकसान होईल. त्यांनी पुढे सांगितले की, त्यांच्या गावात 25 वर्षांनंतर रस्ता बांधला आणि त्या रस्त्यावर दोन शाळा स्थित आहेत. एक जिल्हा परिषदेची व अन्य एक खाजगी शाळा आणि म्हणून जर निविदा काढल्या तर संपूर्ण वाळूची वाहतूक सदर रस्त्याने केली जाईल, अपघात होतील, मग त्यांनी यासाठी कोण जबाबदार राहील असे विचारले. म्हणून त्यांच्या गावासाठी निविदा काढू नये अशी त्यांनी विनंती केली कारण गंगेमध्ये आधीच गाळ आहे व शासनाला जास्त महसूल मिळणार नाही.

17) **श्री.चंद्रकांत विष्णू जाधव, पाथरवाला (बु.) गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, जरी निविदा काढल्या नाहीत तरी वाळु तस्करी मोठ्या प्रमाणावर केली जाते व परिसरातील लोक देखील रात्रीच्या वेळी वाहतूक करतात. जे थांबवल्या जाऊ शकत नाही. त्यामुळे शासनाला महसूल मिळत नाही. त्यांनी सांगितले की, वाळू उपशा करीता त्यांची काही हरकत नाही. कारण त्यामुळे ग्रामपंचायत तसेच शासनाला फायदा होईल.

18) **श्री.गंगाधर भुजंग हाके, पाथरवाला (बु.) गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदामुळे त्यांची पिके, रस्ता खराब होतात व गंगेतील पाण्याची पातळी कमी होते, त्यामुळे निविदा काढण्यात येवू नये.

19) **श्री.पुरुषोत्तम शामराव अरबड, गाव सुरळेगांव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांना सुरळेगावात एकच मुख्य रस्ता आहे आणि त्यांना निविदा काढण्यासाठी हरकत नाही. परंतु निविदा मालकाने पर्यायी व्यवस्था करुन वाळु वाहतुक करावी आणि त्यांचे स्वतःचे तसेच गावकऱ्यांचे असे म्हणणे आहे की, ते मुख्य रस्त्याने वाळू वाहतूक करुन देणार नाही.

20) **श्री.महेश अरबड, गाव सुरळेगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, जे कुणी ठेकेदार असतील त्यांनी मुख्य रस्ता सोडून पर्यायी व्यवस्था करुन वाळू वाहतुक करावी.

21) **श्री.तिर्थराज बापूराव कदम, गाव सुरळेगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, अगोदरच्या निविदेच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वाळू उपासण्यात आलेली आहे आणि आता सरासरी फक्त 4 फुटापर्यंत वाळू उपलब्ध आहे. ज्यामध्ये थोडेफार शेतकरी बागायती करतात. म्हणून त्यांनी सध्याच्या निविदा काढु नये अशी विनंती केली. यापूर्वी आधीच्या निविदा वेळी 10-15 शेतकरी कोरडवाहू शेतकरी झाले आणि फक्त 11-13 शेतकरी शिल्लक आहे. ज्यामध्ये ते स्वतः एक बागायतदार आहेत व फक्त 4 फुट वाळु उपलब्ध आहे आणि त्यांची गंगामध्ये एक विहिर आहे. त्यामुळे ते थोडाफार भाजीपाला काढतात आणि सध्याच्या निविदा काढल्या तर मग त्यांना ऊस तोडणीस जावे लागेल. म्हणून ही निविदा काढु नये अशी त्यांनी पुन्हा विनंती केली.

22) **श्री.रुद्राक्ष बाबुराव कदम, गाव सुरळेगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढु नये कारण निविदामुळे पाण्याचे बाष्पीभवन होते.

23) **श्री.संदिप बाबासाहेब जाधव, सरपंच, ग्रामपंचायत बोरगांव (बु.), ता.गेवराई, जि.बीड** यांनी सांगितले की, वाळू उपशासाठी त्यांची काही हरकत नाही. परंतु ते संध्याकाळी वाळू उपसा करुन देणार नाही. दुसरे त्यांनी सांगितले की, वाळू उपशामुळे त्यांच्या गावाला काही फायदा मिळायला पाहिजे कारण अगोदर त्यांना काहीही मिळाले नाही.

24) **श्री.शिरिषकुमार जनार्दन जाधव, अध्यक्ष, तंटामुक्ती समिती, बोरगांव (बु.), ता.गेवराई, जि.बीड** यांनी सांगितले की, निविदा निघायला पाहिजे. परंतु निविदा मालकाने अटी व शर्तीनुसार वाळू उचलायला पाहिजे, रस्त्याची काळजी घ्यायला पाहिजे, निविदा निश्चितपणे काढायला पाहिजे आणि निविदामुळे ग्रामपंचायतला फायदा व्हायला पाहिजे व पर्यावरणाचा ऱ्हास व्हायला नाही पाहिजे. त्यांनी पुढे सांगितले की, जरी निविदा काढल्या / नाही काढल्या, वाळू तस्कर रात्रंदिवस वाळूची वाहतूक करतात. कारण पोलीस स्टेशनशी त्यांचे नाते फार जवळचे आहे व ते व्यवस्थापित (Managed) आहेत, त्यांच्या गावातील लोकांना

त्रास होतो, परंतु निविदामुळे रस्त्यांची काळजी घेतली जाईल व जास्तीचे उत्खनन केले जाणार नाही आणि ही त्यांची विनंती आहे, असे त्यांनी सांगितले.

25) **श्री.राहूल सतीश जाधव, गाव बोरगांव (बु.), ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी त्यांनी सांगितले की, ही परिषद निविदासाठी आयोजित करण्यात आलेली आहे व त्यांनी त्यातील पर्यावरण विभागाचे कलम ऐकले. डॉ.जोशी यांनी स्पष्ट केले की, सदर सुनावणी ही फक्त पर्यावरणाविषयी आहे व निविदासाठी नाही आणि त्यांनी विनंती केली की, फक्त पर्यावरणासंबंधी जर काही प्रश्न असतील तर ते विचारावेत. श्री.जाधव यांनी सांगितले की, त्यांचे प्रश्न फक्त पर्यावरणाशीच संबंधीत आहेत आणि सर्वप्रथम त्यांनी सांगितले की, वृक्षारोपणासंबंधी मुद्दा मांडला होता. म्हणजे वाळू पट्ट्यामध्ये वृक्षारोपण केले जाईल. परंतु आता वृक्षारोपणामुळे जे नुकसान झाले ते वृक्षारोपणाच्या माध्यमातून भरुन काढण्यासाठी पुष्कळ वेळ / वर्षे लागतील आणि तो पर्यावरणाचा ऱ्हास आहे. दुसरे, वाळू उपशामुळे गंगेतील जलचर पूर्णपणे नष्ट होतील, पाणी पातळी कमी होईल. त्यामुळे जैवविविधतेला धोका निर्माण होईल. जलसाठे संपण्याच्या मार्गावर आहे. गावातील लोक पाण्याचा कोणत्याही प्रकारे वापर करु शकणार नाहीत. त्याचप्रमाणे गोदावरी नदीतील जैवविविधता पूर्णपणे नष्ट होईल. त्यांनी पुढे सांगितले की, वाहतुकीमुळे पुष्कळ समस्या जसे वायु प्रदूषण, ध्वनी प्रदूषण इ. उद्‌भवतात. त्याचप्रमाणे दुसरे गाडी वाहतुकीमुळे रस्त्याच्या दोन्ही बाजुला असलेल्या शेतातील पिकांवर धुळ बसते, त्यामुळे परागकण तयार न होणे, कमी उत्पादन इ. आणि अशा पुष्कळशा समस्या सुध्दा उद्‌भवतात. म्हणून शासनाने शेतकऱ्यांच्या अशा समस्यांवर विचार करायला पाहिजे अशी त्यांनी विनंती केली. शेवटी त्यांनी सांगितले की, वाळू वाहतूक ही गावातून घरे, शाळा इ. च्या बाजुने केली जाते आणि शाळेतील मुलांना शाळेमध्ये आवाज, प्रदूषण वगैरेंचा त्रास सहन करावा लागतो, म्हणून अशा गोष्टींची काळजी घ्यायला पाहिजे अशी त्यांनी विनंती केली. त्यांनी पुढे सांगितले की, भविष्यात वाळु उपशाच्या बाबतीत अशा घटना घडल्या, तर मग वाळु उपसा करणारे लोक ज्यांच्याकडे साधणे, संपत्ती इ. आहे त्यांनी गरीब लोकांना, शेतकऱ्यांना मारहाण करु नये आणि त्यांच्या गावात महसुलाची काही अडचण नाही. परंतु जर ठेकेदार किंवा इतर कुण्या

व्यक्तीने त्यांच्या गावातील लोकांना त्रास देण्याचा प्रयत्न केला तर ते त्यांना उत्तर देण्यास पूर्ण ताकदीसह समर्थ राहतील.

26) **श्री.अशोक भिमराव जाधव, उप-सरपंच, ग्रामपंचायत बोरगाव (बु.), ता.गेवराई, जि.बीड** यांनी सांगितले की, वाळू उपशाबाबत त्यांची काही हरकत नाही. परंतु वाळू उपशासाठी (ब्रास मध्ये) जी परवानगी दिल्या जाईल त्यासाठी ग्रामपंचायतीला एक पत्र द्यायला पाहिजे ज्यामध्ये ठेकेदारांनी परवानगी असेल तेवढाच वाळू उपसा करावा असा उल्लेख असावा, अशी त्यांनी विनंती केली.

27) **श्री.विनायक एकनाथ जाधव, गाव बोरगाव (बु.), ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांच्या गावात वाळु उपसा करायला नको, कारण त्यामुळे रोड वगैरे खराब होतात.

28) **श्री.बाळासाहेब धोंडिराम खंदारे, गाव बोरगाव (बु.), ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी त्यांचे मत सांगितले की, वाळु निविदा काढायला पाहिजे व ते आवश्यक आहे. कारण जरी वाळु निविदा काढल्या नाहीत. तरी वाळु तस्कर थांबत नाही, कुणीही ते थांबवू शकत नाही, त्यांच्या गावातील नागरीक हे सगळे शेतकरी आहे, ते सुध्दा हे थांबवू शकत नाही. म्हणून निविदा काढायला पाहिजे आणि ते आवश्यक आहे व उत्खननाचे काम शासनाच्या नियमाप्रमाणे करायला पाहिजे, परंतु वाळु उपशापासून शासन, ग्रामपंचायत तसेच ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन त्यांच्या गावाला महसुल मिळायला पाहिजे जी त्यांची विनंती आहे व ते सगळे गावकरी अशा मतांचे आहे असे त्यांनी सांगितले.

29) **श्री.प्रभाकर सखाराम पवार, गंगावाडी गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, वाळू निविदासाठी त्यांची काही हरकत नाही. परंतु ग्रामपंचायतीला जो 25% निधी मिळायला पाहिजे तो मिळत नाही, म्हणून त्यासाठी पाठपुरावा करणे आणि शेतकऱ्यांच्या शेतातील खराब पिकांसाठी कर्जाची व्यवस्था करावी अशी विनंती केली.

30) **श्री.यादव कृष्णा प्रल्हाद, गंगावाडी गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांच्या गावाची निविदा काढण्यासाठी काही हरकत नाही. परंतु वापस येणारा 25% निधी योग्य प्रकारे वितरित केला जात नाही व त्यासाठी त्यांनी मागणी केली

तर असे सांगितले जाते की, योग्य पाठपुरावा केल्या जात नाही. म्हणून त्यांनी विनंती केली की, सदर निधी हा नियमानुसार वितरित केला पाहिजे व तो इतर कुणाच्या खात्यावर वर्ग करण्याऐवजी ग्रामपंचायतच्या खात्यावर वर्ग करायला पाहिजे आणि ज्या रस्त्याने वाळू वाहतुक केली जाईल तो रस्ता प्रथम दुरुस्त करायला पाहिजे.

31) **श्री.राजेश्वर डाके, सदस्य - ग्रामपंचायत म्हाळसपिंपळगांव, ता.गेवराई, जि.बीड** यांनी सांगितले की, निविदा काढायला पाहिजे.

32) **श्री.महेंद्र अनिरुध्द टेकाळे, गाव म्हाळसपिंपळगांव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांच्या गावात नदीमध्ये वाळू उघडी नाही कारण नदीमध्ये पूर्ण पाणी भरलेले आहे आणि पाण्यामुळे वाळू उचलण्यासाठी बोट लागेल, म्हणून ते त्यांच्या गावातून वाळू उपशासाठी परवानगी देणार नाही.

33) **श्री.ज्ञानेश्वर डाके, गाव म्हाळसपिंपळगांव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, 25 वर्षांमध्ये त्यांच्या गावाचा रस्ता फार खराब झाला होता आणि आता तो चार ते पाच वर्षांत सिमेंटने बांधला आहे आणि निविदा काढल्यानंतर तो पुन्हा खराब होईल व त्यांना त्यांची वाहने घरीच ठेवावी लागतील. म्हणून त्यांचे म्हणणे असे आहे की, निविदा काढायला नाही पाहिजे कारण त्यामुळे गंगा व पर्यावरण खराब होते.

34) **श्री.डाके भाऊसाहेब सखाराम, गाव म्हाळसपिंपळगांव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, वाळू निविदा काढायला पाहिजे कारण त्यामुळे त्यांचे कोणतेही नुकसान होत नाही.

35) **श्री.रामदास चिमाजी पवार, गाव हिंगणगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा प्रक्रियेसाठी त्यांची काहीही हरकत नाही, परंतु निविदा प्रक्रिया शासनाचे नियम पाळून करायला पाहिजे.

36) **श्री.परदेशी गोविंद नरसिंह, गाव हिंगणगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, ते निविदास समर्थन देतात.

37) **श्री.संभाजी बाबासाहेब मदने, गाव हिंगणगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढायला पाहिजे व त्याचा फायदा ग्रामपंचायतीला मिळायला पाहिजे.

38) **श्री.परमेश्वर इश्वरसिंग परदेशी, गाव हिंगणगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढणे योग्य आहे, परंतु रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ठेव ठेवायला पाहिजे.

39) **श्री.श्रीराम अंकुशराव घाटोल, काठोडा गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढण्यासाठी त्यांची काही हरकत नाही, परंतु सदर प्रक्रियेमध्ये जे मोठे खड्डे तयार होतात ते भरायला पाहिजे आणि नंतर, निविदा नंतर वृक्षारोपण केव्हा व कसे केल्या जाईल असे त्यांनी विचारले. डॉ.बाळंखे यांनी सांगितले की, प्रश्नांची नोंद घेतलेली आहे व सगळया प्रश्नांची एकदाच उत्तरे देण्यात येतील.

40) **श्री.बाप्पासाहेब आप्पासाहेब शेळके, पांचाळेश्वर गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, पांचाळेश्वर हे तीर्थक्षेत्राचे गाव आहे, गोदावरी पात्रात दत्तांचे मंदिर आहे, मंदिरापासून 500 मिटर अंतराच्या निकषानुसार वाळु उपशासाठी कार्यक्षेत्र फार कमी आहे. सदर क्षेत्रातुन वाळु उपसा केल्या जाऊ शकत नाही. म्हणून वाळूचा लिलाव होवू नये अशी त्यांची इच्छा आहे. त्यांनी पुढे सांगितले की, गंगेच्या काठाजवळ फक्त एकच रस्ता आहे, ज्यावर एक शाळा देखील स्थित आहे आणि ते एक तिर्थक्षेत्र व गोदावरी नदीत प्रभु दत्ताचे महास्थान असल्यामुळे त्यांनी विनंती केली की, त्यांची वैयक्तिक इच्छा आहे की, वाळू लिलाव होवू नये आणि इतरांची इच्छा / मत ऐकून घ्यावे अशी सुध्दा त्यांनी विनंती केली.

41) **श्री.आबासाहेब कपाटे, पांचाळेश्वर गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांच्या गावातील वाळूची स्थिती लक्षात घेता व ते तिर्थक्षेत्र असल्यामुळे आणि रस्ते खराब होतात, त्यांची इच्छा आहे की, निविदा काढायला नाही पाहिजे.

42) **श्री.संदिप राजगुरु, सरपंच, ग्रामपंचायत राजापूर, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांची निविदासाठी काही हरकत नाही. परंतु त्यांच्या गावच्या मुख्य

रस्त्याऐवजी निविदासाठी त्यांच्या गावच्या शिव रस्त्याचा वापर करावा आणि जो काय 25% निधी आहे तो सरळ ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात यावा, जेणेकरुन खराब झालेले रस्ते दुरुस्त होवू शकतील.

43) **श्री.बालाजी बाबासाहेब गिते, सरपंच, ग्रामपंचायत सावरगांव, ता.गेवराई, जि.बीड** यांनी सांगितले की, मागच्या वर्षाची निविदा पूर्ण झालेली नाही आणि वाळू वाहतुकीमुळे रस्ते तसेच शेतजमीन खराब झालेली आहे. ठेकेदार कुणालाही भीत नाही व अधिकारी त्यांच्याकडे लक्ष देत नाही आणि म्हणून निविदा संपल्यानंतर वाळू वाहतूक थांबवायला पाहिजे.

44) **श्री.घनशाम रंगनाथ वरे, उप-सरपंच खामगाव / सावरगाव, ता.गेवराई, जि.बीड** यांनी सांगितले की, त्यांच्या गावात वाळू निविदा काढायला नाही पाहिजे.

45) **श्री.बापू शिवलाल कोंढारे, राक्षसभुवन गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढण्यास काही अडचण नाही. परंतु वाळू वाहतूक ही पर्यायी रस्ता तयार करुन करायला पाहिजे आणि शेतकऱ्यांना त्यांच्या गोदावरी नदीत असलेल्या मोटर पाईपलाईनबद्दल नुकसान भरपाई द्यायला पाहिजे.

46) **श्री.रविंद्र तुळशीराम धुमाळ, राक्षसभुवन गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांच्या गावात शनी मंदिराच्या वरच्या बाजूस 1 कि.मी. व खालच्या बाजूस 1 कि.मी. अंतरावर या ठिकाणासाठी जर निविदा काढल्या तर त्यांचा काहीही विरोध नाही. त्यांनी सांगितले की, मागच्या पंचवार्षीक योजनेत त्यांनी रु.19.93 कोटी खर्च करुन रस्ता बांधला, जो राक्षसभुवन, सुरळेगाव, गुळस, पांचाळेश्वर व म्हाळसपिंपळगाव या गावांसाठी फक्त एकच रस्ता आहे आणि निविदा नंतर वाळू वाहतूक फक्त या रस्त्यानेच केली जाईल. म्हणून संबंधीत ठेकेदाराने सदर रस्त्याच्या खराब होण्याबाबत नुकसान भरपाई द्यावी अथवा पर्यायी व्यवस्था करावी, अशी विनंती केली.

47) **श्री.नारायण दिलीपराव नाटकर, राक्षसभुवन गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, राक्षसभुवन येथे वाळु निविदामुळे पाणी उपलब्ध राहणार नाही आणि म्हणून सदर भागातील शेतकऱ्यांना अडचणींना तोंड द्यावे लागेल आणि वाळु उपशामुळे गंगा

नदीतील पाईपलाईन व रस्ते खराब होतात ते सुध्दा शेतकऱ्यांना सहन करावे लागते. म्हणून त्यांनी विनंती केली की, अशा समस्यांसाठी जर ठेकेदाराने पर्यायी व्यवस्था केली तर मग निविदासाठी त्यांची काही हरकत नाही.

48) **श्री.वसिष्ट सौरव शिंदे, सरपंच, ग्रामपंचायत, नागझरी, ता.गेवराई, जि.बीड** यांनी सांगितले की, निविदा काढण्यासाठी त्यांची काहीही हरकत नाही. परंतु वाहतूक त्यांच्या गावच्या शिव रस्त्याने केली पाहिजे. स्वातंत्र्यापासून त्यांच्या गावाला रस्ता नाही.

49) **श्री.संभाजी घमट, नागझरी गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांच्या गावात निविदा काढायला पाहिजे, कारण काही लोक चोरुन वाळू विकतात. त्यामुळे महसुल अधिकारी, सरपंच व ग्रामसेवक यांना त्रास होतो. त्यांनी पुढे सांगितले की, आमदार निधीतून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेसाठी रु.1.08 कोटी दिलेले आहेत आणि आमदार साहेबांचे देखील म्हणणे आहे की, वाळू, वगैरे चोरी व्हायला नको व रस्ता खराब व्हायला नको आणि त्यांच्या सरपंचांनी आधी सांगितल्या प्रमाणे त्यांच्याकडे जो पर्यायी रस्ता उपलब्ध आहे त्याचा वाळू वाहतूकीसाठी वापर करायला पाहिजे आणि त्यांनी पुन्हा सांगितले की, निविदा काढायला पाहिजे.

50) **श्री.दत्तात्रय बाबासाहेब भुसारे, नागझरी गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढायला पाहिजे, कारण रात्रंदिवस वाळू तस्कर वाळूची चोरी करतात. त्यांनी विनंती केली की, वाळू तस्करांकडून त्यांना त्रास व्हायला नको.

51) **श्री.शिंदे रंगनाथ त्रिंबकराव, नागझरी गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढायला पाहिजे आणि त्यांची काहीही हरकत नाही.

52) **श्री.सुखदेव काशीनाथ नन्नेर, नागझरी गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढायला पाहिजे, कारण वाळु फुकट जाते व त्यांना त्रास देखील होतो. म्हणून निविदा काढल्या तर त्यांना त्रास होणार नाही.

53) **श्री.भास्कर रखमा शिंदे, नागझरी गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांच्या गावचे सर्व नागरिक या मताचे आहेत की, निविदा काढायला पाहिजे,

परंतु वाळू वाहतूक त्यांच्या गावच्या बाजुला स्थित असलेल्या पर्यायी रस्त्याने करायला पाहिजे.

54) **रंजना उमेश बडे, सरपंच, ग्रामपंचायत संगमजळगांव, ता.गेवराई, जि.बीड** यांनी सांगितले की, निविदाला प्राधान्य दिले जाईल आणि सध्या बेकायदेशीर वाळू उपसा केल्या जात आहे. म्हणून निविदा जर काढल्या तर त्याचा शासन तसेच ग्रामपंचायतीला फायदा होईल. त्यांनी विनंती केली की, निविदानंतर निविदा ठेकेदाराने शासनाचे नियम पाळायला पाहिजे. त्यांनी पुढे सांगितले की, रस्त्याच्या समस्या गंभीर आहेत, संपूर्ण भागात युतीच्या काळामध्ये चांगले रस्ते बांधले आहेत. परंतु निविदानंतर हायवामधून क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहतूकीमुळे रस्ते खराब होतात. म्हणून त्यासाठी मार्ग शोधावा अशी त्यांनी विनंती केली.

55) **श्री.रविंद्र शिरसाट, गाव संगमजळगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, लिलावाविषयी त्यांची काहीही तक्रार नाही आणि वाळुचोरी ऐवजी वाळू लिलाव चांगला आहे. परंतु पर्यावरणाचा ऱ्हास, वगैरे होवू नये यासाठी काळजी घ्यायला पाहिजे आणि चोरट्या वाळू वाहतूकीमुळे मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत बांधलेला त्यांच्या गावचा रस्ता खराब झाला.

56) **श्री.कानिफनाथ नागरे, गाव संगमजळगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढण्यास त्यांची काही हरकत नाही. परंतु त्यांना वाळू तस्करांकडून त्रास होतो. पाणी पातळी देखील खाली जाते. परंतु शासकीय महसुलाचे नुकसान होण्याऐवजी निविदा काढणे योग्य होईल आणि त्यांच्या गावकऱ्यांची मागणी आहे की, निविदानंतर खराब होणारा रस्ता शासनाला मिळणाऱ्या निधीचा वापर करुन ताबडतोब दुरुस्त करायला पाहिजे.

57) **श्री.नवनाथ नागरे, गाव संगमजळगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, संपूर्ण प्रश्न हा वाळूचा आहे. म्हणून वाळू उपशामुळे पर्यावरण, रस्ता वगैरे चांगले राहतील काय असे त्यांनी विचारले, कारण पाणी कमी होते व जनावरांना पिण्यास पाणी शिल्लक राहत नाही.

58) **श्री.यशवंत प्रभाकर नागरे, गाव संगमजळगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी त्यांच्या गावकऱ्यांच्या वतीने सांगितले की, निविदा काढण्यासाठी त्यांची काही हरकत नाही. सध्या तेथे बेकायदेशीर उत्खनन आहे. म्हणून निविदा काढणे चांगले आहे. अलिकडे CMGSY अंतर्गत संगमजळगाव, हिंगणगाव व बोंदी या तिन्ही गावांसाठी एकच रस्ता बांधलेला आहे जो पूर्णपणे खराब झालेला आहे. म्हणून निविदा काढण्यापूर्वी सदर रस्त्यासाठी काहीतरी तरतूद करावी अशी त्यांनी विनंती केली आणि त्यांचा भाग हा ऊसाचा भाग आहे व रस्त्याशिवाय ऊस वाहतूक होवू शकत नाही. म्हणून शासनाकडे पाठपूरावा करावा, जेणेकरुन त्यांची रस्त्याची समस्या कायमस्वरुपी सोडविली जाईल अशी त्यांनी विनंती केली.

59) **श्री.राजकुमार ज्ञानोबा बडे, गाव संगमजळगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, वाळू उपशामुळे त्यांच्या गावातून ऊस वाहतूक करण्यास ते समर्थ नाहीत, कारण जर वाळू तस्करांचे वाळू ट्रॅक्टर / हायवा अडविले (जाण्यास परवानगी दिली नाही) तर ते सरळ मारहाण करतात. म्हणून त्यांच्या गावातून वाळू उपसा व्हायला नको अशी त्यांची इच्छा आहे.

60) **श्री.कटके भारत आसाराम, बोरगावथडी गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, वाळू उचलल्या जाऊ शकते, परंतु चांगल्या पावसाळयामुळे मंगळूर बंधाऱ्यात पाणी साठलेले आहे आणि पाणी असल्यामुळे वाळु उपशासाठी ते बोटींचा वापर करतील. म्हणून त्यांनी विनंती केली की, पर्यावरणाला कांही त्रास व्हायला नको.

61) **श्री.राजेंद्र बाळाभाऊ खिल्लारे, बोरगावथडी गाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, जर वाळू उपसा केला तर त्यांच्या भागातील पाणी पातळी कमी होईल आणि रस्ते देखील खराब होतील, म्हणून निविदा काढू नये अशी त्यांनी विनंती केली.

62) **श्री.सुभाष शिवाजीराव केरुळकर, गाव सावळेश्वर, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, गेवराई तालुक्यात सावळेश्वर येथे अद्यापपर्यंत निविदा काढलेल्या नाहीत आणि निविदा काढण्यास त्यांची काहीही हरकत नाही.

63) **श्री.ज्ञानेश्वर उधे, गाव सावळेश्वर, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, जर निविदा काढल्या तर त्यांची काहीही हरकत नाही.

64) **श्री.गणेश परमेश्वर उधे, गाव सावळेश्वर, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, निविदा काढायला पाहिजे, त्यासाठी चारी रस्ता वापरायला पाहिजे.

त्यानंतर डॉ.योगिनी बाळंखे यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव आणि परळी तालुक्यातील 32 वाळू घाटांच्या बाबतीत आक्षेप, सुचना इ. नोंदविले आहेत आणि आता अप्पर जिल्हाधिकारी, बीड त्याबाबत स्पष्ट करतील.

श्री.तुषार ठोंबरे, अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यातील 32 वाळू घाटांच्या वाळू लिलावाविषयी आजच्या जाहीर लोकसुनावणी संदर्भातील नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सर्व संबंधीत ग्रामपंचायती, गावे आणि सार्वजनिक ठिकाणी ठेवण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने सर्व नागरिकांनी संबंधीत ग्रामपंचायतीच्या ठिकाणी उपस्थित राहून त्यांची मते, शंका उपस्थित केल्या. ज्यामध्ये काही आक्षेप पर्यावरण, रस्ते, पाणी पातळी कमी होणे याबाबतीत महसुल अधिकारी व इतर शासकीय कर्मचारी यांना होणाऱ्या त्रासाच्या बाबतीत होते आणि काही मते व्यक्त केली ती वाळू लिलाव घेण्याच्या समर्थनार्थ होते. त्यांनी सांगितले की, पहिली महत्त्वाची बाब ही आहे की, राज्य शासन आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करुन पर्यावरणासंबंधी अहवाल तयार केला होता व तो शासनाला सादर केला होता व त्यास मान्यता मिळाल्यानंतर सदर जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली आणि त्यामुळे कुठेतरी वाळु लिलाव करतांना त्यासाठी काही मार्गदर्शक सुचना आहेत, जसे वाळु लिलाव काही विशिष्ट मर्यादेपर्यंत करायला पाहिजे. त्यामुळे त्या भागातील पर्यावरणाचे नुकसान व्हायला नको, त्या भागातील लोक बाधीत व्हायला नको, त्या भागातील लोकांच्या शास्वत विकासावर विपरित परिणाम व्हायला नको वगैरे. अशा सर्व मार्गदर्शक सुचनांचा विचार करुन पर्यावरण विषयक सल्लागारांची नेमणूक करण्यात आली होती आणि त्या पर्यावरण विषयक सल्लागारांनी प्रत्येक वाळू घाटाला व्यक्तिशः भेट दिली व वाळूपात्राच्या तपशिलांचा अभ्यास केला, जसे त्याची लांबी, रुंदी, पाण्याची उपलब्धता तसेच सदर

भागातील पशु-पक्षाचा नैसर्गिक निवारा, भूजलावरील परिणाम आणि वाळू उपशानंतरची भूजलाची पातळी, गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम, सभोवतालच्या परिसरातील शेती संबंधी काही परिणाम होईल काय आणि सदर भागातील पर्यावरण व वातावरणावर काही विपरित परिणाम होईल काय, वगैरे आणि वरील पैलू लक्षात घेवून संबंधीत तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी पर्यावरणविषयक अहवाल तयार केला होता. त्यांनी पुढे सांगितले की, डॉ.बाळंखे यांनी सांगितल्याप्रमाणे वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या नोटीसीमध्ये उल्लेखित अहवाल व कागदपत्रे ज्या ठिकाणी लोकांच्या अभ्यासासाठी ठेवले होते ती ठिकाणं दिलेली आहेत आणि पर्यावरणाशी संबंधी विविध पैलूंचा देखील अहवालामध्ये उल्लेख केलेला आहे. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, वाळू उपसा करतांना वाळू उपशाची मर्यादा निश्चित करण्यात येणारी पाणी पातळी व पाणी पातळीवर काही परिणाम व्हायला नको आणि पर्यावरणाचे नुकसान व्हायला नको अशा अटी व शर्ती ठेकेदास वाळू लिलावासाठी परवानगी देताना लादण्यात येतात. अशा प्रकारच्या अटी व शर्ती सुरुवातीपासून शेवटपर्यंत ऑनलाईन निविदा प्रक्रियेसाठी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या निविदामध्ये सुध्दा उल्लेखित केल्या जातात आणि ज्या लिलावधारकांना अशा अटी व शर्ती मान्य आहेत तेच लिलावामध्ये भाग घेवू शकतात. कारण सदर अटी व शर्ती त्यांच्यावर बंधनकारक असतात. त्यांनी पुढे सांगितले की, पाण्याच्या समस्यांविषयी काही विशिष्ट प्रश्न उपस्थित करण्यात आले त्यासाठी योग्य ती काळजी घेतल्या जाईल. हरित पट्टा विकासाच्या संबंधाने, हरित पट्ट्याची लांबी व रुंदी, लावण्यात येणाऱ्या झाडांची संख्या, झाडांच्या प्रजाती आणि सदर भागात राहणाऱ्या लोकांना तसेच पर्यावरणास त्याचा फायदा या बाबतचा मार्गदर्शक सुचनांचा सादरीकरणा दरम्यान उल्लेख केलेला आहे; प्राणी व पिण्याच्या पाण्याविषयी काही विशिष्ट प्रश्न उपस्थित केल्या गेले. त्यासाठी भूजलाची पातळी विचारात घेण्यात आली, रस्त्यांच्या स्थितीविषयी प्रश्न उपस्थित केल्या गेले, जसे काही ठिकाणी प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत बांधलेले रस्ते चांगले आहेत परंतु सततच्या आणि अवजड वाळू वाहतुकीमुळे सदर रस्ते खराब होतात, या संदर्भात त्यांनी सांगितले की, जेथे वाळू लिलाव होतो तेथे अटी व शर्तीचे पालन केल्या जाते, रस्त्यांची

दुरुस्ती गौण खनिज विकास प्रतिष्ठाण निधी अंतर्गत निधीतून केल्या जाऊ शकते, कोणत्याही गावामध्ये वाळू उपशामुळे जर पिण्याच्या पाण्याची काही समस्या असेल तर त्यासाठी गौण खनिज विकास प्रतिष्ठाण निधीतून मदत दिल्या जाऊ शकते. अन्य मुद्दा लोकांनी उपस्थित केला तो असा की, पूर्वी जेथे वाळू लिलाव झालेला नाही तेथे मोठ्या प्रमाणवर वाळू चोरी होते. अशा वाळू चोरीमुळे शासनाला महसूल मिळत नाही. शासकीय अधिकाऱ्यांवर हल्ले होतात आणि म्हणून या बाबतीत लोकांनी वाळू लिलाव घेण्यासाठी समर्थन दर्शविले. त्यांनी स्मरण करुन दिले की, म.प्र.नि.मंडळाचे डॉ.जोशी यांनी विविध शासन निर्णयांविषयी उल्लेख केला आणि सांगितले की, लिलावानंतर अटी व शर्तीचे पालन केल्या जात नाही असे कुणीतरी सांगितले. श्री.ठोंबरे यांनी स्पष्ट केले की, वाळू लिलावानंतर त्या अटी व शर्ती लिलावधारकांवर बंधनकारक आहेत आणि जर त्यांनी सदर अटी व शर्तींचे उल्लंघन केले तर त्यामध्ये दंडाची तरतूद आहे. त्यांनी सांगितले की, पर्यावरणाचा मुद्दा हा फक्त शासनाचाच नाही तर तो निसर्ग आणि समाजाच्या दृष्टीकोनातून देखील महत्त्वाचा आहे आणि म्हणून वाळू लिलावानंतर अटी व शर्तीचे पालन करण्याविषयीची काळजी वाळू लिलावधारकांकडून घेण्यात येईल. कारण ते त्यांच्यावर बंधनकारक आहे. त्यांनी सांगितले की, काही लोकांनी गौण खनिज विकास प्रतिष्ठाण निधीतून काही भाग संबंधीत ग्रामपंचायतीला मिळण्याविषयी सांगितले. त्यावर त्यांनी स्पष्ट केले की, गौण खनिज विकास प्रतिष्ठाण निधीचे मुलभूत तत्त्व हे वाळू उत्खननामुळे जेथे समस्या उद्‌भवतात तेथे मदत देणे असे आहे आणि जेथे अटी व शर्तीचे पालन करुन वास्तविक वाळूचे उत्खनन केले आहे व जेथे पाणी, रस्ते इ.साठी सदर निधी खर्च करणे आवश्यक आहे तेथे सदर निधीतून संबंधीत ग्रामपंचायतीला मदत मिळू शकते. कुणीतरी बोटीद्वारे वाळू उपसा करण्याचा मुद्दा उपस्थित केला होता. या बाबतीत त्यांनी स्पष्ट केले आणि प्रशासनाच्या वतीने सांगितले की, बोटीद्वारे वाळु उपसा करण्यासाठी परवानगी नाही आहे आणि जेथे कुणी बोटीद्वारे वाळु उपसा करण्याचा प्रयत्न केला तर मग संबंधीताविरुध्द नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल आणि अपवादात्मक परिस्थितीमध्ये जर बोटीद्वारे वाळू उपसा करायची गरज असेल तर त्यासाठी मंत्रालयात प्रस्ताव सादर करावा

लागतो आणि अधिकृत / सक्षम अधिकाऱ्याकडून मान्यता मिळाल्यानंतर परवानगी दिल्या जाऊ शकते. परंतु अशी बाब अद्यापपर्यंत प्रस्तावित नाही व आज जरी वाळू लिलाव झाला तरी बोटीद्वारे वाळू उपसा करण्यासाठी कोणतीही मान्यता नाही. त्यांनी सांगितले की, गावकऱ्यांनी पर्यावरण आणि प्रशासन विषयी जे मुद्दे उपस्थित केले त्याबाबतचा सगळया शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

डॉ.बाळंखे यांनी डॉ.जोशी यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सुचवायचे आहे काय अशी विनंती केली, मग डॉ.जोशी यांनी सांगितले की, अप्पर जिल्हाधिकारी साहेबांनी सर्व मुद्दे कव्हर केले आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, फक्त गाड्यांचीच देखभाल नाही तर पर्यावरणाविषयीचे नियम पालन करणे अनिवार्य आहे. जे दिनांक 03/09/2019 च्या शासन निर्णयामध्ये उल्लेखीत आहे. जेथे वाळु उत्खनन करायचे आहे त्या भागातील नैसर्गिक साधन संपत्तीचे काही नुकसान होवू नये यासाठी लिलावधारकाने काळजी घ्यायला पाहिजे. विकास प्राधिकरणाने वाळू, पाणी यांचे सर्वेक्षण केल्याशिवाय उत्खनन केले नाही पाहिजे आणि क्षमतेपेक्षा जास्त वाळू उत्खनन करायला नाही पाहिजे. जर एखादा अपघात घडला तर लिलावधारकाने संबंधीत पोलीस स्टेशनला कळवायला पाहिजे. दि.03/09/2019 च्या शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हायला पाहिजे. लिलावधारकाने पर्यावरण व्यवस्थापन योजनेची योग्य रितीने अंमलबजावणी करायला पाहिजे अशी देखील त्यांनी विनंती केली.

डॉ.योगिनी बाळंखे आणि श्री.तुषार ठोंबरे यांनी सार्वजनिक सहभागींना पून्हा विनंती केली की, वरिल प्रश्नाव्यतिरिक्त आणखी कुणाचे काही प्रश्न असतील तर ते विचारु शकतात.

65) **श्री.डाके, गाव म्हाळसपिंपळगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांच्या गावात वाळू लिलाव घ्यायला नाही पाहिजे. कारण पाण्याची पातळी फार खाली आहे व पाणी प्रदूषीत आणि खारे झालेले आहे. त्यामुळे ते जनावरांना, लोकांना पिण्यास उपयुक्त नाही व शेतीसाठी देखील उपयुक्त नाही आणि जर लिलाव झाला तर पाणी आणखी प्रदूषीत होईल. म्हणून लिलाव करु नये अशी त्यांनी विनंती केली. त्यांनी पुढे

सांगितले की, 15 वर्षांनंतर रोड बांधला आहे व लिलावामुळे तोसुध्दा खराब होईल. म्हणून त्यांच्या गावात वाळूचा लिलाव करायला नाही पाहिजे अशी त्यांनी नम्रपणे शासनाला विनंती केली. त्यावर श्री.ठोंबरे यांनी सांगितले की, त्यांच्या मुद्द्यांची नोंद घेतली आहे.

नंतर श्री.तुषार ठोंबरे, अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांनी सांगितले की, सर्व लोक सदर जाहीर लोकसुनावणीमध्ये सकाळपासून सहभागी झाले. सर्व नागरिकांनी त्यांच्या शंका उपस्थित केल्या व त्यांनी सदर शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला. संबंधीत ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, उप-विभागीय अधिकारी, तहसिलदार, म.प्र.नि.मंडळाचे अधिकारी आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी त्यांची उपस्थिती नोंदविली. त्यांनी सांगितले की, जाहीर लोकसुनावणीचा अहवाल तयार केला जाईल व तो शासनाला सादर केला जाईल आणि वाळू लिलावासंबंधी पुढील कार्यवाही शासनाकडून मिळणाऱ्या मार्गदर्शक सुचनानुसार केली जाईल. त्यांनी सांगितले की, जाहीर लोकसुनावणीची प्रक्रिया शांततेने व विचारपूर्वक पार पडली आणि नंतर त्यांनी जाहिर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सगळया सार्वजनिक सहभागींचे आभार मानुन जाहिर लोकसुनावणी संपन्न केली.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानुन जाहीर लोकसुनावणी संपन्न झाली.

**(डॉ.प्रविण जोशी)**
सदस्य

**(राहुल रेखावार)**
अध्यक्ष

**(डॉ.योगिनी बाळंखे)**
समन्वयक